# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५११११०
ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/सन २०१६ | ५१०८ दि.३१/०८/२०१६

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. शासन अधिसूचना , महसूल व वनविभाग क्र.प्राफेब ११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/१-१० दि.२१/०९/१३
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११ सप्टेंबर २०१४
५. प्राधिकरणाकडील आदेश क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/५४९/२०१४ दिनांक १०/१०/२०१४
६. शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक पदनि २०१४/प्र.क्र.२४५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक ०१/०८/२०१६
७. शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक राजस २०१६/प्र.क्र.२३५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक २०/०८/२०१६

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या दि.१३ ऑगस्ट २०१३ च्या (सुधारणा) अधिनियमातील कलम ७३ कब नुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्याची तरतुद आहे. आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अधिसुचीत करण्यात आलेले आहेत. नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२(८) नुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे . सहकारी संस्थांचे निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमतील नियम ३ अन्वये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची नेमणूक करण्याचा अधिकार आहेत . आणि,

ज्याअर्थी, प्राधिकरणाकडील दिनांक १०/१०/२०१४ च्या आदेशान्वये संपूर्ण ठाणे जिल्हयातील सहकारी संस्थांचे निवडणूकीसाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था ठाणे यांची नियुक्ती करण्यात आली होती . आणि,

ज्याअर्थी, ठाणे जिल्हयाचे विभाजन करुन पालघर , वसई , डहाणू , तलासरी , जव्हार , वाडा , मोखाडा , आणि विक्रमगड या तालुक्यांचा समावेश असणारा पालघर हा स्वतंत्र जिल्हा वाचावे क्र. ३ येथील अधिसूचनेनूसार दिनांक ०१ ऑगस्ट २०१४ पासून निर्माण करण्यात आलेला आहे . त्यानूसार शासन निर्णय सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग क्रमांक पदनि २०१४/प्र.क्र.२४५/ ५ स, मंत्रालय , मुंबई यांचे दिनांक ०१/०८/२०१६ अन्वये नवनिर्मित पालघर